महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २५३ वे दिनांक : ०९/०९/२०२६ वार : बुधवार

## खेळाडूंसाठी नोकरीत सुधारित आरक्षण; आरोग्य यंत्रणेच्या सक्षमीकरणासाठी 'प्रगती' प्रकल्पाला मंजुरी



**मुंबई** : राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. विशेषतः क्रीडा, आरोग्य, वस्त्रोद्योग आणि विधी व न्याय विभागाशी संबंधित अनेक धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये मिळणाऱ्या आरक्षणाबाबत सुधारित धोरण लागू करण्याचा निर्णय सरकारने आजच्या बैठकीत घेतला आहे. यासह सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने नवा प्रकल्प राबवण्यासही मंजूरी देण्यात आली आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे नवीन सत्र न्यायालय स्थापन करण्यासही मंजूरी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

राज्यातील गुणवंत व यशस्वी खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रांतील नोकऱ्यांमध्ये मिळणाऱ्या ५ टक्के आरक्षणाबाबत सुधारित धोरण लागू करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. या सुधारित धोरणामुळे पूर्वीचे सर्व शासन निर्णय, शासन शुद्धीपत्रके, परिपत्रके आणि संबंधित पत्रे पूर्णपणे रद्द करण्यात आली आहेत.

सार्वजनिक आरोग्य यंत्रणा अधिक सुदृढ, अद्ययावत आणि तंत्रज्ञानस्नेही करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'प्रगती' (PRAGATI - Primary Healthcare Reimagined with Advanced Governance and Accessible Technology Integration) हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीत राबवल्या जाणाऱ्या या प्रकल्पासाठी आशियाई विकास बँकेकडून (ADB) अर्थसाहाय्य (कर्ज) घेण्यास आणि त्यामध्ये राज्य शासनाचा आर्थिक वाटा समाविष्ट करण्याच्या प्रस्तावाला शासनाने मंजुरी दिली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे नवीन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यात येणार आहे. या न्यायालयासाठी आवश्यक असणारी पदे निर्माण करण्यास तसेच खर्चाच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे.

वस्त्रोद्योग विभागांतर्गत ह्योसंग इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना भांडवली अनुदान देण्यास मंजूरी देण्याचा निर्णय देखील आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

कैवल्यधाम योगिक सेंटर: मुंबई येथील कैवल्यधाम ईश्वरदास चुन्नीलाल योगिक सेंटरच्या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे सवलतीच्या दरात नूतनीकरण करण्यास मंजूरी.

कोराडी तीर्थक्षेत्र विकास: नागपूर जिल्ह्यातील कोराडी येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत विकसित करण्यात येत असलेली शासकीय जमीन श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानाला हस्तांतरित करण्यास मंजूरी.

बुद्धिस्ट मिशनला जमीन: चेंबूर येथील 'भिक्खू संघ युनायटेड बुद्धिस्ट मिशन' या संस्थेला त्यांच्या सध्याच्या वहिवाटीत असलेली जमीन देण्याचा निर्णय.

## FDAच्या कारवाईवर हायकोर्ट संतापलं : तुकाराम मुंढेंच्या विभागाला खडेबोल





**मुंबई** : राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाचे (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या धडक कारवायांदरम्यान आता मुंबई उच्च न्यायालयाने अन्न व औषध प्रशासन विभागाची कानउघडणी केली आहे. एखाद्या आस्थापनाने अन्नसुरक्षा नियमांमधील त्रुटी दूर केल्यानंतरही त्याचा परवाना निलंबित ठेवणे योग्य नसल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने FDA ला महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. पुण्यातील 'सिद्धार्थ ॲग्रो' कंपनीने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले. नियमांतील त्रुटी दूर केल्यानंतर संबंधित आस्थापनाची पुन्हा तपासणी करावी आणि सर्व नियमांची पूर्तता झाल्याचे स्पष्ट झाल्यास परवाना निलंबनाचा आदेश तातडीने मागे घ्यावा, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

याचिकाकर्ता 'सिद्धार्थ ॲग्रो' ही पुण्यातील कंपनी असून ती प्राण्यांसाठी खाद्यपदार्थ तसेच डेअरी उत्पादने तयार करते. अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन झाल्याच्या आरोपावरून अन्न व औषध प्रशासनाने कंपनीच्या परवान्यावर कारवाई केली होती. FDA ने १५ जुलै रोजी कंपनीवर धाड टाकून कारवाई केली होती. त्यानंतर २९ जुले रोजी पुन्हा तपासणी करण्यात आली. यावेळी कंपनीने अन्नसुरक्षा नियमांतील त्रुटी अद्याप दूर केलेल्या नसल्याचा दावा विभागाने केला होता. मात्र, कंपनीने सर्व आवश्यक त्रुटी दूर केल्याचे सांगत मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. याप्रकरणी न्यायालयाने FDA ला चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली. आस्थापनांनी नियमांतील त्रुटी दूर केल्यानंतरही परवाना निलंबित ठेवला जात असेल, तर त्यांना न्यायालयात जावे लागणे ही निरर्थक बाब असल्याचे खंडपीठाने म्हटले. "आस्थापनांना काम करण्यापासून रोखले जात आहे. त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होते. तसेच कर्मचारी आणि संपूर्ण पुरवठा साखळीवर त्याचा परिणाम होतो," असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

एखादा प्रशासकीय आदेश रद्द करून घेण्यासाठी संबंधित कंपनीला वारंवार न्यायालयात जावे लागणे योग्य नसल्याचेही न्यायालयाने नमूद केले. असे वाद प्रशासनाच्या स्तरावरच सहज टाळता येऊ शकतात. अन्यथा संबंधित कंपनीसोबतच न्यायालयावरही अनावश्यक कामाचा ताण निर्माण होतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. खंडपीठाने FDA ला स्पष्ट निर्देश देताना म्हटले की, एखाद्या आस्थापनाने नियमांतील त्रुटी दूर केल्यानंतर त्याची पुन्हा तपासणी करण्यात यावी. तपासणीमध्ये नियमांचे योग्य प्रकारे पालन झाल्याचे आढळल्यास परवाना निलंबनाचा आदेश तातडीने मागे घेण्यात यावा. नियमांचे पालन झाल्याचे अहवालातून स्पष्ट झाल्यानंतरही संबंधित आस्थापनाला न्यायालयात जाण्यास भाग पाडू नये, असेही महत्त्वाचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या काही महिन्यांपासून विभागाने विविध ठिकाणी धडक कारवाया सुरू केल्या आहेत. हॉटेल, रेस्टॉरंट, अन्न उत्पादन करणाऱ्या कंपन्या तसेच औषध उत्पादन आणि विक्री आस्थापनांची सातत्याने तपासणी करण्यात येत आहे. अन्न आणि औषधांच्या गुणवत्तेबाबत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जात असल्याने FDA सध्या चर्चेत आहे. उपलब्ध माहितीनुसार, जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांत राज्यातील २,९०२ औषध उत्पादन आणि विक्री आस्थापनांची तपासणी करण्यात आली. यामध्ये ८८० आस्थापनांवर नियमांचे उल्लंघन आढळल्याने कारवाई करण्यात आली. तपासणी करण्यात आलेल्या आस्थापनांमध्ये ६०७ उत्पादन आणि २,२९५ विक्री आस्थापनांचा समावेश होता. तर कारवाई झालेल्यांमध्ये १४० उत्पादन आणि ७४० विक्री आस्थापनांचा समावेश आहे. उत्पादन क्षेत्रात ॲलोपॅथी औषधांशी संबंधित आस्थापनांवर सर्वाधिक कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे.

दरम्यान, तुकाराम मुंढे यांनी यापूर्वी अन्नसुरक्षा नियमांच्या अंमलबजावणीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अन्नसुरक्षा नियमांचा उद्देश भेसळ रोखणे आणि नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करणे हा आहे. कोणत्याही सण, धार्मिक परंपरा किंवा सांस्कृतिक उपक्रमांवर बंदी घालणे हा या नियमांचा उद्देश नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. आता मात्र मुंबई उच्च न्यायालयाने FDA ला दिलेल्या निर्देशांमुळे कारवाई करताना नियमांची कठोर अंमलबजावणी आणि संबंधित आस्थापनांना न्याय्य संधी यामध्ये समतोल राखण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

या प्रकरणावर राज्य सरकार किंवा अन्न व औषध प्रशासनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

## महावितरणच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी गजेंद्र बावणे रुजू



**छत्रपती संभाजीनगर** : महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदाची सूत्रे गजेंद्र चिंतामण बावणे यांनी मंगळवारी (८ सप्टेंबर) स्वीकारली. प्रशासकीय सेवेत विविध महत्त्वाच्या पदांवर काम केल्यानंतर आता त्यांची महावितरणच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती झाली आहे. मूळचे नागपूर येथील रहिवासी असलेले गजेंद्र बावणे यांनी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातून एम.एससी. (ॲग्री) पदवी प्राप्त केली आहे. १९९९ मध्ये राज्य शासनाच्या सेवेत सरळ सेवेने उपजिल्हाधिकारी म्हणून अमरावती येथे त्यांनी प्रशासकीय कारकिर्दीला सुरुवात केली.

त्यानंतर त्यांनी बुलढाणा जिल्हा जात पडताळणी समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. तसेच अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयात महसूल आणि पुनर्वसन विभागाचे अतिरिक्त आयुक्त म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. विविध प्रशासकीय पदांवर काम करताना त्यांनी महसूल, पुनर्वसन तसेच सामाजिक विषयांशी संबंधित कामकाजाचा अनुभव घेतला. सन २०२५ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत (IAS) पदोन्नती झाल्यानंतर त्यांची पुणे येथील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या आयुक्तपदी नियुक्ती झाली. या पदावर त्यांनी जवळपास वर्षभर काम केले. त्यानंतर आता त्यांच्याकडे महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ सप्टेंबर २०२६


## जिल्ह्यात कौशल्यवर्धन केंद्राचे काम अंतिम टप्प्यात

**बीड (भगवंत पाळवदे) :** बीड जिल्ह्यातील तरुण-तरुणींना रोजगाराभिमुख आणि तंत्रज्ञानयुक्त शिक्षण मिळण्यासाठी एक मोठी सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. टाटा टेक्नॉलॉजीज आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरातील औद्योगिक वसाहतीमध्ये एका अद्ययावत व तंत्रज्ञानयुक्त कौशल्यवर्धन प्रशिक्षण केंद्राचे अंतिम टप्प्यात आले आहे. तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी आणि उद्योजकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपल्या कौशल्याचा विकास करावा आणि रोजगाराच्या नवीन संधी प्राप्त कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

कौशल्यवर्धन केंद्रामध्ये रोजगाराभिमुख एकूण १८ विविध अभ्यासक्रम चालविले जाणार असून पहिल्या वर्षासाठी हे सर्व कोर्सेस विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.या अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती आणि मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळावे, या उद्देशाने बीड जिल्ह्यातील पाच प्रमुख ठिकाणी विशेष माहिती सत्र आयोजित करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील आयटीआय, पॉलिटेक्निक आणि अभियांत्रिकी पदवीच्या विद्यार्थ्यांनी तसेच स्थानिक उद्योजकांनी या सेमिनारला उपस्थित राहावे. विद्यार्थ्यांपर्यंत या कोर्सेसची इत्थंभूत माहिती पोहोचवण्यासाठी जिल्ह्यातील पाच वेगवेगळ्या ठिकाणी सेमिनार आयोजित केले जाणार आहेत. इच्छुकांनी आपल्या जवळच्या केंद्रावर उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा. या प्रशिक्षण केंद्रात प्रवेश मिळविण्यासाठी आणि नाव नोंदणी करण्यासाठी प्रशासनातर्फे एक विशेष क्यूआर कोड जारी करण्यात आला आहे. विद्यार्थी हा क्यूआर कोड स्कॅन करून आपली नोंदणी अत्यंत सुलभरीतीने करू शकतात. जिल्ह्यात माहिती सत्राचे दि.८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत बीड येथील शासकीय तंत्रनिकेतन तर दुपारी ३ ते ४ यावेळेत आदित्य तंत्रनिकेतन होणार आहे. दि.९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत अंबाजोगाई येथील टी.बी.गिरवलकर तंत्रनिकेतनमध्ये तर दुपारी ३ ते ४ यावेळेत माजलगाव येथील इगलवुड तंत्रनिकेतनमध्ये होणार आहे. दि.१० सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत आष्टी येथील आनंद चॅरिटेबल ट्रस्ट डिप्लोमा इन इंजिनियरिंग अँण्ड टेक्नॉलॉजी येथे आयोजन करण्यात आले आहे. तरी आपल्या जवळच्या सेमिनारला उपस्थित राहून सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा

## डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन येथे पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न!




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन येथे मंगळवार, दि. 8 सप्टेंबर 2026 रोजी पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन पद्मश्री फातमा रफीक झकेरिया सभागृहात करण्यात आले. या प्रसंगी "Elite" इंग्रजी व्याकरण या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. मकदूम फारुकी, प्राचार्य, मौलाना आझाद कॉलेज यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला प्रा. विद्या प्रधान, प्रभारी प्राचार्य, यांची प्रमुख उपस्थिती होती.हे पुस्तक डॉ. अनिस शेख आणि सौ. तौसीफ फातिमा यांनी लिहिले असून त्यामध्ये इंग्रजी व्याकरण, शैक्षणिक लेखन कौशल्ये, शब्दसंग्रह विकास तसेच एआय आणि सॉफ्ट स्किल्स यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश करण्यात आला आहे. उपस्थित शिक्षक, विद्यार्थी व मान्यवरांनी लेखकांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक योगदानाचे कौतुक केले.

## जयभवानीत मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे उद्बोधन शिबिर व यशकार्ड वाटप




**पाटोदा (प्रतिनिधी) :** जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा तथा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (अभ्यासकेंद्र कोड क्र. २२१६४) यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन शिबिराचे व द्वितीय, तृतीय वर्षाचे यशकार्ड वाटप कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी सांस्कृतिक सभागृहात करण्यात आले. मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम वअभ्यास केंद्राचे केंद्रप्रमुख प्राचार्य प्रो.डॉ. सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.एस.एम. जाधव होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. घाडगे एस. व्ही. उपस्थित होते.कार्यक्रमाची प्रस्तावना केंद्र संयोजक डॉ. वंदन जाधव यांनी केली. त्यांनी मुक्त विद्यापीठाची शिक्षण पद्धती, अभ्यासक्रम व विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधांबाबत मार्गदर्शन केले.यावेळी मार्गदर्शक म्हणून डॉ. शिवाजी काकडे, प्रा. विनोद किर्दक व डॉ. लोखंडे बी. बी. यांनी विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाचे महत्त्व, परीक्षेची तयारी व उज्ज्वल भविष्याच्या संधी यावर सखोल मार्गदर्शन केले. मुक्त विद्यापीठाच्या 'ज्ञानगंगा घरोघरी या ब्रीदवाक्याचा जागर त्यांनी केला. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या वतीने कु. शेलार राजनंदीनी, कु. मुरुमकर व श्री. जगताप यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन डॉ. अशोक देवगुडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. दीपक जावळे यांनी केले. या शिबिरास मोठ्या संख्येने विदयार्थी उपस्थित होते.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ सप्टेंबर २०२६


## शिक्षण हाच प्रगतीचा पाया; इकरा पब्लिक स्कूलमध्ये जागतिक साक्षरता दिन उत्साहात



**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज,जळगाव येथे जागतिक साक्षरता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यानिमित्त महाविद्यालयात भव्य माहितीपूर्ण व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांमध्ये शिक्षण आणि साक्षरतेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. झिया-उन-निसा मॅडम यांनी प्रभावी भाषणातून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना, “शिक्षणाशिवाय जीवनाला योग्य दिशा मिळू शकत नाही,” असे प्रतिपादन केले.इश्तियाक अहमद सर यांनी दैनंदिन जीवनातील साक्षरतेचे महत्त्व स्पष्ट करून भारतातील निरक्षरतेच्या प्रमाणाची माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडली. दानिश अहमद सर यांनी शिक्षण हे व्यक्तीला यशाच्या सर्वोच्च शिखरापर्यंत घेऊन जाणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य शेख शकील यांनी शिक्षणाला व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक परिवर्तनाची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, ज्ञानामुळे माणसाला योग्य-अयोग्याची जाणीव होते आणि विचार करण्याची स्वतंत्र क्षमता विकसित होते.योग्य ज्ञान असलेल्या व्यक्तीच्या मनावर सहजपणे कोणाचेही वर्चस्व निर्माण होऊ शकत नाही. त्यांनी साक्षर आणि निरक्षर व्यक्तीच्या जीवनातील फरक स्पष्ट करत विद्यार्थ्यांनी शिक्षणाला केवळ परीक्षेपुरते मर्यादित न ठेवता जीवन समृद्ध करण्याचे साधन म्हणून स्वीकारावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन संस्कृती विभागप्रमुख आरिफ खान सर यांनी आपल्या दमदार आणि प्रभावी आवाजात केले.संपूर्ण कार्यक्रमातून “साक्षरता म्हणजे केवळ वाचन-लेखन नव्हे, तर ज्ञान, विचारशक्ती, आत्मविश्वास आणि प्रगतीचा मार्ग आहे” हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या विस्तार केंद्राचे उद्घाटन




**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा लिगल अँण्ड जनरल एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय व माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या सहकार्याने विस्तार केंद्राचे उद्घाटन आणि ‘सामाजिक सलोखा’ या विषयावरील व्याख्यानाचा कार्यक्रम मंगळवार, दि. 8 सप्टेंबर 2026 रोजी उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. अश्विन रांजणीकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. ‘सामाजिक सलोखा’ या विषयावर समाजशास्त्राच्या अभ्यासक डॉ. स्मिता अवचार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अपर्णा कोत्तापल्ले होत्या. यावेळी डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल, गोपीनाथ मुंडे अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. संग्राम गुंजाळ, डॉ. पिराजी कांबळे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या कार्यक्रमाधिकारी डॉ. मीनाक्षी देव-निमकर, प्रा. चिन्मयी देशपांडे, गुणवत्ता व हमी कक्षाचे संचालक डॉ. पराग चौधरी आणि डॉ. अभय जाधव यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.प्रास्ताविकातून डॉ. अन्विता अग्रवाल यांनी विस्तार केंद्राच्या स्थापनेमागील भूमिका स्पष्ट केली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केवळ पदवीचे शिक्षण न देता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास, कौशल्यविकास आणि रोजगारक्षमतेला चालना देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.उद्घाटनपर मार्गदर्शन करताना डॉ. अश्विन रांजणीकर यांनी आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालयीन तसेच सामाजिक स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना सक्षम, स्वावलंबी आणि रोजगाराभिमुख बनविण्यासाठी विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या स्वयंनिर्वाही अभ्यासक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. बदलत्या काळानुसार शिक्षणाची व्याप्ती वाढविणे आणि विद्यार्थ्यांना उपयुक्त कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करून देणे ही आजची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.‘सामाजिक सलोखा’ या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. स्मिता अवचार यांनी सलोखा या संकल्पनेचा सूचक अर्थ स्पष्ट केला. एकता, एकात्मता, बंधुभाव आणि समरसता या मूल्यांचा व्यापक आशय त्यांनी समकालीन सामाजिक परिस्थितीतील विविध उदाहरणांच्या माध्यमातून उलगडून सांगितला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच सामाजिक शास्त्रांचे महत्त्व अधोरेखित करताना रंग, भाषा, प्रदेश, जात, धर्म, पंथ आणि लिंगभेद यांसारख्या विविधतेतून सामाजिक सलोखा निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. विविधतेचा स्वीकार आणि परस्परांचा सन्मान यांतूनच सुदृढ समाजाची निर्मिती होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.अध्यक्षीय समारोपात डॉ. अपर्णा कोत्तापल्ले यांनी भारतीय संविधानाने दिलेली लोकशाही मूल्ये प्रत्येक नागरिकाने आत्मसात करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्याभिमुख आणि रोजगारक्षम कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन त्यांनी केले. या दृष्टीने आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने राबविण्यात येणारे स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. महिला महाविद्यालयाच्या वतीने सुरू असलेल्या ‘ग्रंथालय व्यवस्थापन’ आणि ‘सौंदर्य संवर्धन व व्यक्तिमत्त्व विकास’ या स्वयंनिर्वाही अभ्यासक्रमांच्या समन्वयक ग्रंथपाल प्रा. ज्योत्स्ना जावळे, प्रा. अश्विनी शहाणे, डॉ. प्रज्ञा किंवंदे, डॉ. वर्षा पाईकराव आणि डॉ. नेत्रा शेळके यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या दोन्ही अभ्यासक्रमांना विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

8 सप्टेंबर ‘आंतरराष्ट्रीय साक्षरता दिना’निमित्त दोन्ही महाविद्यालयांच्या वतीने घेण्यात आलेल्या घोषवाक्य लेखन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मीनाक्षी देव-निमकर यांनी केले, तर प्रा. चिन्मयी देशपांडे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ सप्टेंबर २०२६

## शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या प्रलंबित तक्रारी दोन दिवसांत निकाली काढा - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन




**बीड (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी प्रशासनाने पावले उचलली आहेत. तरी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर प्रलंबित असलेल्या सर्व तक्रारींचे पुढील दोन दिवसांत निवारण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व राष्ट्रीयकृत बँकांना दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांच्यासह जिल्ह्यातील विविध बँकांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी राष्ट्रीयकृत बँकांच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली. तसेच बँकांनी कोणत्याही परिस्थितीत आगामी दोन दिवसांत सर्व तक्रारी निकाली काढाव्यात, जेणेकरून पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असे आदेशही बैठकीत देण्यात आले. या बैठकीत जिल्ह्यातील कर्जमुक्ती योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला आणि प्रलंबित प्रकरणावर चर्चा करण्यात आली. बीड जिल्ह्यातील एकूण २,२७,१२८ थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांची माहिती योजनेच्या विशेष पोर्टलवर भरण्यात आली आहे. यापैकी ९६,५२३ शेतकऱ्यांची पहिली यादी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रसिद्ध यादीतील ७९,६८१ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. अद्याप १६,८४२ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले नाही. आधार प्रमाणीकरण प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांपैकी ८,३०५ शेतकऱ्यांनी अजूनही त्यांचा फार्मर प्राप्त करून घेतलेला नाही, ज्यामुळे त्यांचे प्रमाणीकरण रखडले आहे. या योजनेचा लाभ घेताना शेतकऱ्यांना येणाऱ्या विविध अडचणींवर ऑनलाइन पोर्टलद्वारे तक्रारी नोंदवण्याची सुविधा देण्यात आली आहे.

७ सप्टेंबर २०२६ पर्यंत प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या संदर्भात जिल्हास्तरावर एकूण २६७ तक्रारी आणि तालुकास्तरावर ४७ तक्रारी प्रलंबित आहेत. अशी माहिती यावेळी देण्यात आली. प्रशासनाने इतर शेतकऱ्यांनाही त्यांचे फार्मर आयडी प्राप्त करण्याचे तसेच आपले आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्याचे आवाहनही केले आहे

## शिवाजी महाविद्यालयात साक्षरता रॅली संपन्न




**कन्नड (प्रतिनिधी) :** येथील शिवाजी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त साक्षरता रॅली काढण्यात आली.महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागाच्या वतीने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन साक्षरतेचे महत्त्व पटवून दिले. महाविद्यालयाच्या प्रांगणातून रॅलीला सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गावरून ही रॅली काढण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी 'साक्षर होऊया, देश घडवूया' अशा घोषणा देत जनजागृती केली.यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. प्रकाश महाजन यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोडिंग ऑटोचा अपघात एकाचा मृत्यू




**दौलताबाद (जावेद अहमद) :** खुलताबाद मार्गावर दौलताबाद घाटाखाली ऐतिहासिक दिल्ली गेट जवळ मंगळवारी सकाळी दहा चाळीस च्या सुमारास लोडिंग पलटी होऊन झालेल्या अपघातात सचिन सखाराम बहादुरे वय 38 वर्षे राहनार देवगाव चाल नांदेड जिल्हा नांदेड याचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सचिन हे खुलताबाद येथील उरूस मध्ये जेन्स नाईट पॅन्ट विक्री करत होते थोडासा माल शिल्लक राहिल्याने आपल्या मालकासोबत खुलताबाद येथून लोडिंग अॅपे रिक्षा क्रमांक एम एच 11 सी जे 4009 मध्ये बसून छत्रपती संभाजी नगर रेल्वे स्टेशन कडे जात असताना दौलताबाद घाटाखाली ऐतिहासिक दिल्ली गेट जवळ लोडिंग अॅपे रिक्षा सचिन यांच्या अंगावर पडून झालेल्या अपघातात गंभीर जखमी झाले त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी दवाखान्यात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषित केले

## महाराष्ट्रातील दुष्काळाचे संकटदूर व्हावे यासाठी श्री शिवराज भैय्या भुमरे प्रतिष्ठानच्या वतीने विशेष महारुद्र अभिषेक



**छत्रपती संभाजीनगर :** शरणापुर महाराष्ट्रावर ओढवलेले दुष्काळाचे सावट दूर व्हावे आणि राज्यात समाधानकारक पाऊस पडून बळीराजा सुखी व्हावा, यासाठी आज पशुपतेश्वर महादेवाला विशेष महाअभिषेक करण्यात आला हस्ते श्री शिवराज भैय्या भुमरे जिल्हा परिषद सदस्य प्रमुख उपस्थिती. १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगीरी महाराज मठाधिपती यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले शरनापुर परिसरातील नागरिक आणि १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगीरी महाराज श्री शिवराज भैय्या भुमरे यांनी भगवान पशुपतेश्वराला पाऊस पडवा साकडे घातले.गेल्या काही काळापासून राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाने ओढ दिल्यामुळे पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. धरणांमधील पाणीसाठा खालावला असून, खरिपाची पिके करपून जाण्याच्या मार्गावर आहेत. या पार्श्वभूमीवर, मंदिरामध्ये धार्मिक वातावरणात पूजेला सुरुवात झाली.मंत्रोच्चारात दुधाभिषेक आणि प्रार्थनावेदमूर्ती ब्राह्मणांच्या मंत्रोच्चारात भगवान शिवाला दूध, दही, मध, ऊसाचा रस आणि पवित्र जलाचा महाअभिषेक करण्यात आला. यावेळी 'हर हर महादेव' आणि जय पशुपतेश्वर'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. दूधा अभिषेकानंतर पर्जन्यसूक्ताचे पठण करण्यात आले आणि राज्यातील दुष्काळ निवारणासाठी प्रार्थना केली आयोजक श्री शिवराज भैय्या भुमरे प्रतिष्ठान. विशेष सहकार्य सांडुजी पवार साहेब डॉ दादाराव कांबळे उदयसेन काळे पंचायत समिती सदस्य प्रशांत भिंगारे शुभम कांबळे बंटी आम्ले माऊली आम्ले सनी मापारी दत्ता धारकर प्रसाद हरेर डॉ अनिकेत मापारी रवी कसबे चिन्मय भिकणे व पंचक्रोशीतील शेतकरी तसेच भक्त परीवार मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ सप्टेंबर २०२६



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## शिक्षक

ज्ञानाची मशाल हाती घेऊन,
अंधारातून प्रकाशाकडे नेतो.
समाजातील अंधश्रद्धा संपवून,
नित्य समाजाची काळजी घेतो. १

अक्षर ओळख करून देऊन,
नित्य दावितो ज्ञानाचे प्रकाश.
शिस्त,संस्कार बिंबवुनी अंगी,
करून देतो मोकळे आकाश. २
जगण्याची बाराखडी शिकवून,
मुलांना देतो जगण्याचे भान.
प्रत्येक मुलांच्या भविष्यासाठी,
लिहितो सोनेरी अक्षरात पान. ३

चांगल्या वाईटाची ओळख,
बालमनाला सदा पटवून देतो.
ज्ञानदान करताना समाजाची,
विकासाची दिशा ठरवून घेतो. ४

बालमनावर बिंबवुनी देशप्रेम,
विचार संपन्न पिढी घडविते.
भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार,
लेखणी हाती घेऊन पळविते. ५




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## त्र्यंबकेश्वरमध्ये चौथे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन; अध्यक्षपदी डॉ. सुभाष बागल



**छत्रपती संभाजीनगर :** शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या चौथ्या अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक तथा छत्रपती संभाजीनगर येथील प्रा. डॉ. सुभाष साहेबराव बागल यांची निवड करण्यात आली आहे. फाउंडेशनचे राज्याध्यक्ष डॉ. शिवचरण मधुकर उज्जेनकर यांनी डॉ. बागल यांना याबाबतचे निमंत्रण दिले आहे. हे साहित्य संमेलन ३ व ४ ऑक्टोबर २०२६ रोजी नाशिक जिल्ह्यातील संतश्रेष्ठ श्री. निवृत्तीनाथ महाराज समाधी मंदिर, श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे उत्साहात पार पडणार आहे. खुलताबाद येथील चिश्तिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेले डॉ. सुभाष बागल हे समीक्षक आणि कवी म्हणून परिचित आहेत. त्यांचे 'नारायण सुर्वे यांचा जाहीरनामा', 'संदेशन प्रक्रिया आणि मराठी भाषा विकास ', 'बा. भो. शास्त्री: व्यक्ती आणि वाङ्ममय' (संपा.) 'मराठी वाङ्:मयाचा वस्तुनिष्ठ इतिहास', 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने : एक दृष्टिक्षेप', 'संत तुकारामांचे अभंग : एक चिंतन', ' महानुभाव: तत्त्वविचार आणि मूल्यदृष्टी', 'सुर्वेयुगाची पहाट', 'मराठी साहित्य: आशय आणि परिशीलन' हे समीक्षणात्मक ग्रंथ तसेच 'ऋतुगंध' व 'कुणबी माझा' या कवितासंग्रहांसह अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथांचे लेखन व संपादन केले आहे. डॉ. सुभाष बागल यांच्या साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना कराड येथील यशवंतराव चव्हाण ग्रंथोत्तेजक पुरस्कार, मुक्ताईनगर येथील तापी-पूर्णा राज्यस्तरीय पुरस्कार, अहिल्यानगर येथील शब्दगंध साहित्य पुरस्कार, अंबड येथील आचार्य भानूकवी राज्यस्तरीय पुरस्कार असे अनेक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. बागल यांच्या साहित्यावर एक राज्यस्तरीय चर्चासत्र व एक राष्ट्रीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या 'संत तुकारामांचे अभंग: एक चिंतन' या महत्वपूर्ण ग्रंथावर डॉ. दतात्रय डुंबरे व डॉ. शिवाजी हुसे यांनी ' तुकोबा: चिंतन आणि समीक्षा' या ग्रंथाचे संपादन केले आहे. या दोनही ग्रंथाची दखल घेऊन डॉ. सुभाष बागल यांचा राज्यस्थानचे राज्यपाल मा. हरिभाऊ जी बागडे नाना यांच्या शुभ हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात त्यांनी अनेक संशोधकांना मार्गदर्शन केले आहे. डॉ. सुभाष बागल यांचे १० विद्यार्थी पीएच. डी. पदवी प्राप्त आणि ०६ विद्यार्थी एम. फिल्. पदवी प्राप्त झाले आहेत. त्यांचे ७० पेक्षा अधिक शोध निबंध प्रकाशित आहेत. मराठा सेवा संघ, छत्रपती संभाजीनगरच्यावतीने डॉ. बागल यांच्या साहित्यावर एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. शिवचरण ऊज्जैनकर फाउंडेशन गेल्या १६ वर्षांपासून शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, कला, आरोग्य, कृषी, संशोधन, पत्रकारिता व पर्यावरण या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत आहे. मुक्ताईनगरसह गोवा, पन्हाळगड, कोल्हापूर, पुणे, अमरावती आदी ठिकाणी फाउंडेशनतर्फे राज्यस्तरीय व अखिल भारतीय पातळीवर विविध साहित्यविषयक उपक्रम राबवले गेले आहेत. डॉ. सुभाष बागल यांची संमेलनाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल साहित्यिक, लेखक, कवी व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. मराठी भाषा व साहित्याच्या संवर्धनासाठी आणि नव्या पिढीमध्ये साहित्यिक जाणिवा निर्माण करण्यासाठी हे संमेलन अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# ब्रह्मगिरी परिक्रमा : एक अविस्मरणीय प्रवास




**ए**का भटक्यासाठी डोंगर म्हणजे देव नसतो, तर एक जिवंत विद्यापीठ असते. पुस्तकात न शिकवले जाणारे धडे तिथे मिळतात. अशीच एक शिकवणारी भटकंती नुकतीच झाली. दिनांक 7 सप्टेंबर 2026 रोजी तिफण ट्रेकिंग ग्रुप सोबत मी ब्रह्मगिरीची परिक्रमा पूर्ण केली. रात्री 12 वाजता सुरू झालेला हा प्रवास सकाळी 8 वाजता संपला. 8 तास हा प्रवास माझ्यासाठी पुण्यसंचय नव्हता, तर निसर्ग आणि पर्यावरण समजून घेण्याचा एक प्रयत्न होता.परिक्रमा म्हणजे काय?माझ्या दृष्टीने परिक्रमा म्हणजे एखाद्या भू-रचनेला 360 अंशातून समजून घेणे. आपण एखाद्या पर्वताकडे फक्त समोरून पाहतो. पण त्याला वळसा घालून गेलो की त्याचे चारही चेहरे दिसतात. त्याच्या पायथ्याचे जग, त्याच्या पोटातून वाहणारे पाणी, त्याच्या अंगावरचे गवत हे सगळे कळते. हीच खरी भटकंती.ब्रह्मगिरी हा पश्चिम घाटाचा एक महत्त्वाचा भाग आहे. पश्चिम घाट हा जगातील सर्वात जास्त जैवविविधता असलेल्या 8 ठिकाणांपैकी एक आहे. याच पर्वतातून गोदावरीचा उगम होतो. म्हणजेच हा पर्वत एक नैसर्गिक जलस्तंभ आहे. त्याची परिक्रमा करणे म्हणजे या जलचक्राचा प्रत्यक्ष अभ्यास करणे.रात्री 12:00 - अंधाराचा अनुभवआम्ही सुरुवात केली त्र्यंबकेश्वरातील कुशावर्त कुंडापासून. रात्री बारा वाजता शहर शांत होते. आम्ही मुद्दाम टॉर्च बंद करून पाच मिनिटे उभे राहिलो. शहरात आपल्याला खरी रात्र कधीच मिळत नाही. इथे खरी रात्र होती. डोळे अंधाराला सरावले तेव्हा कान जास्त सक्रिय झाले. पाण्याची खळखळ, रातकिड्यांचा आवाज. ध्वनी प्रदूषण नसलेल्या ठिकाणी निसर्ग किती बोलका असतो, हे तेव्हा कळते.पहाटे 2:00 - शेतातून चालतानाशहराची हद्द संपली आणि भाताची शेते सुरू झाली. सप्टेंबर महिना म्हणजे भातशेतीचा ऐन बहर. गुडघाभर पाण्यात उभी असलेली हिरवीगार रोपे. ही शेती पाहिली की लक्षात येते की इथला शेतकरी हवामानाशी कसा जुळवून घेतो. इथे रासायनिक खतांचा मारा नाही. बांधावरची करवंद, जांभूळ हीच त्याची जैविक कुंपणे. हे शाश्वत शेतीचे उत्तम उदाहरण आहे.वाटेत छोट्या छोट्या आदिवासी वस्त्या लागल्या. घरे साधी, मातीची. पण प्रत्येक घराभोवती झाडे लावलेली. त्यांचे जीवन निसर्गापासून वेगळे नाही, तर निसर्गातच आहे.पहाटे 4:30 - पाण्याचे अर्थशास्त्रया परिक्रमेचा आत्मा म्हणजे पाणी. वाटेत अनेक छोटे ओढे लागले. पाणी इतके स्वच्छ की तळ दिसत होता. एक गोष्ट स्पष्ट दिसली. जिथे वरच्या बाजूला झाडी दाट आहे, तिथे ओढ्याला पाणी जास्त आहे. जिथे झाडे तोडली आहेत, तिथे माती वाहून गेली आहे आणि ओढा कोरडा पडला आहे. ब्रह्मगिरी हा गोदावरीचा जलस्तंभ कसा आहे, हे यावरून कळते. जंगल हेच खरे धरण आहे, जे पावसाचे पाणी शोषून घेते आणि वर्षभर सोडते.सकाळी 6:00 - ढगांच्या देशातबऱ्याच पायऱ्या चढून आम्ही वरच्या पठारावर आलो. गौतम ऋषी मंदिराच्या पुढे खरा निसर्ग सुरू होतो.सकाळी सहा वाजता आम्ही पूर्णपणे धुक्यात हरवलो. हे धुके नव्हते, तर जमिनीवर उतरलेले ढगच होते. पश्चिम घाटावर मान्सूनचे ढग अडकतात आणि त्यामुळेच हा भाग सदाहरित राहतो. दहा फुटापलीकडे काहीच दिसत नव्हते. फक्त पांढरा शुभ्र कापूस अंगाला स्पर्श करत होता. या ढगांमुळेच इथे नेचे, शेवाळे, रानफुले वाढतात. मी प्रत्यक्ष ढगातून चालत होतो. हा या भटकंतीचा सर्वोच्च क्षण होता.सकाळी 8:00 - परतीचा विचारउतरताना एक वेगळे चित्र दिसले. वर स्वच्छ असलेले तेच ओढे शहरात येताच प्लास्टिक आणि कचऱ्याने भरले होते. वरच्या आणि खालच्या जीवनातला हा फरक विचार करायला लावणारा होता.8 वाजता आमची परिक्रमा पूर्ण झाली. पाय भरून आले होते, पण मन हलके झाले होते. तिफण ट्रेकिंग ग्रुपने एक आदर्श पाळला - कोणीही कचरा टाकला नाही, मोठ्याने गाणी लावली नाहीत.या प्रवासाने मला एकच गोष्ट शिकवली. ब्रह्मगिरीला जपणे म्हणजे गोदावरीला जपणे आणि गोदावरीला जपणे म्हणजे आपल्या भविष्याला जपणे. निसर्गाला फक्त देव मानून पूजा करण्यापेक्षा, त्याला समजून घेऊन त्याचे रक्षण करणे जास्त महत्त्वाचे आहे. हीच तर भटकंतीची खरी शिकवण आहे.

**डॉ. शिवाजी हुसे**

(एका भटक्याची शोधयात्रा या सदरातील लेख)

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ सप्टेंबर २०२६


## कुणबी नोंदींसाठी मंडळस्तरावर शिबिरे आयोजीत करुन माहिती देणार

**कन्नड (अरुण थोरात) :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आढळलेल्या मराठा कुणबी, कुणबी मराठा नोंदींची माहिती जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच मंडळस्तरावर शिबिरांचे आयोजन करुनही ही माहिती लोकांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिली आहे. दरम्यान प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सुचना फलकावर त्या त्या गावातील याद्या प्रदर्शित कराव्या असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज दुरदृष्यप्रणालीद्वारे दिले आहेत. मराठा, मराठा कुणबी, कुणबी मराठा अशा जात नोंदींची माहिती जुन्या दस्तऐवजांवरुन सापडल्या आहेत. त्यांची संख्या जिल्ह्यात ५११३ आहे. तालुकानिहा या नोंदी याप्रमाणे, सोयगाव ३१, पैठण-१८४, वैजापूर-६८७, सिल्लोड- ३५७, गंगापुर- ७६१, खुलताबाद-३४१, फुलंब्री-२६१, छत्रपती संभाजीनगर-१०३९ व कन्नड- १४५२ इतक्या आहेत. या सर्व नोंदी व त्यांचे दस्तऐवज डिजीटल स्वरुपात जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. https://chhatrapatisambhajinagar.maharashtra.gov.in / या संकेतस्थळावर या नोंदी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. संकेतस्थळावर मराठा कुणबी दस्त नोंदी असा स्वतंत्र टॅग उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यावर जाऊन प्रत्येक तालुकानिहा नोंदी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्यावर क्लिक करुन नोंदीची यादी, नाव व दस्ताचा प्रकार पाहता येतो. दस्त यावर क्लिक केल्यास प्रत्यक्ष दस्तही डिजीटल स्वरुपात प्रमाणित केलेली प्रत पाहता येते. दरम्यान या संदर्भात आज राज्याचे जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दुरदृष्यप्रणालीद्वारे आढावा घेतला. त्यात त्यांनी निर्देश दिले की, प्रत्येक जिल्ह्यात मंडळनिहाय शिबिरे आयोजीत करुन लोकांना ह्या याद्या पहावयास उपलब्ध करुन द्याव्या. मराठवाड्यात येत्या दि.१७ रोजी विशेष ग्रामसभा घेऊनही माहिती देण्याचे नियोजन करता येईल, असे श्री. विखे पाटील यांनी सांगितले.तसेच संकेतस्थळावर नोंदी उपलब्ध करुन देण्याच्या पुढाकाराच्या प्रयत्नाची श्री. विखे पाटील यांनी वाखाणणी केली. तसेच या नोंदींपैकी मोडी लिपी, ऊर्दू नोंदींच्या भाषांतर, लिप्यांतराचीही सोय उपलब्ध करुन द्यावी,असे त्यांनी सांगितले. जिल्ह्यात मंडळनिहाय शिबिरेजिल्ह्यात दि.१० ते १७ दरम्यान सर्व तालुक्यात मंडळनिहाय कुणबी मराठा जात प्रमाणपत्र वितरण, तसेच याद्या पाहण्यासाठी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. ते याप्रमाणे-अपर तहसिल छत्रपती संभाजीनगर- (एकूण मंडळ-०५) दि.१९ भावसिंगपुरा, दि.११- पंढरपूर, दि.१२ कांचनवाडी, दि.१५ उस्मानपुरा, दि.१७ – छत्रपती संभाजीनगर.छत्रपती संभाजीनगर (एकूण मंडळ- ०९)- दि.१०-चौका, दि.११ वरुड काझी, पिसादेवी, दि.१२- शेकटा, लाडसावंगी, दि.१५- चिकलठाणा, करमाड, दि.१६- कचनेर, चित्तेपिंपळगाव.पैठण (एकूण मंडळ-१२)- दि.१९- पाचोड, आडूळ, दि.११- आपेगाव, विहामांडवा, दि.१२- पैठण, पिंपळवाडी, दि.१५- बालानगर, नादर, दि.१६- ढोरकीन, निलजगाव, दि.१७- बिडकीन, लोहगाव.फुलंब्री (एकूण मंडळ-०५)- दि.१०- आळंद, दि.११-बाबरा, दि.१५- पिरबावडा, दि.१६-वडोद बाजार. खुलताबाद(एकूण मंडळ-०४)- दि.१०- खुलताबाद, दि.११- वेरुळ, दि.१२- सुलतानपूर, दि.१३- बाजारसावंगी.कन्नड (एकूण मंडळ-१०)- दि.१०-नाचनवेल, चिंचोली, लिंबाजी, दि.११- देवगाव रंगारी, चापानेर, दि.१२-हतनूर, चिकलठाण, दि.१३-कन्नड- नागद, दि.१५- करंजखेडा.सिल्लोड (एकूण मंडळ-११)- दि.१०-भराडी, बोरगाव बाजार, आमठाणा, दि.११- सिल्लोड, पालोद, निल्लोड, दि.१५- अंभई, दि.१६-अजिंठा, शिवना, दि.१७-गोळेगाव बु., उंडणगाव. सोयगाव (एकूण मंडळ-०४)- दि.११- सोयगाव, सावळदबारा, दि.१५-जरंडी, दि.१६- बनोटी.गंगापूर(एकूण मंडळ-१२)- दि.१०-वाळूज, तुर्काबाद, दि.११-आसेगाव, गाजगाव, दि.१२- हर्सूल, डोणगाव, दि.१५-सिद्धनाथ वडगाव, गंगापूर, दि.१६- मांजरी, जामगाव, दि.१७- भेंडाळा, शेंदूरवादा. वैजापूर (एकूण मंडळ-१२)- दि.१२- गारज, शिऊर, दि.११- लोणी खु., जानेफळ, दि.१२- खंडाळा, बोरसर, दि.१५-लासूरगाव, महालगाव, दि.१६- बाबतरा, नागमठाण, दि.१७-वैजापूर, घायगाव.

## ‘एआय तारक की मारक?’ तालुकास्तरीय वादविवाद स्पर्धेत विद्यार्थ्यांची अभ्यासपूर्ण मांडणी



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** मुरुम येथील प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे कै. माधवरावजी पाटील (काका) यांच्या स्मरणार्थ प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मुरूम येथे उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) मानवासाठी तारक की मारक ? या विषयावरील तालुकास्तरीय वाद-विवाद स्पर्धा मंगळवारी (ता. 8) रोजी प्रतिभा निकेतन विद्यालयात उत्साहात पार पडली.या स्पर्धेला उमरगा-लोहारा तालुक्यातील उच्च माध्यमिक विद्यालयाचे एकूण 11 संघानी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला असून एकूण 22 विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.स्पर्धेचे उद्घाटन नगर शिक्षण विकास मंडळाचे सचिव शरण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उल्हास घुरघुरे होते. यावेळी प्राचार्य चंद्रकांत बिराजदार, प्राचार्य महेश्वर होगाडे, पर्यवेक्षक विवेकानंद परसाळगे, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, विलास वाडीकर, अमर भोसगे, सुजित शेळके, सचिन पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचा आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी थेट संबंधित असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगिता आणि संभाव्य धोक्यांवर स्पर्धकांनी अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही बाजूंनी प्रभावी मते मांडली. शिक्षण, आरोग्य, विज्ञान, उद्योग, रोजगार आणि दैनंदिन जीवनात AI मुळे होत असलेल्या बदलांपासून ते रोजगारांवरील परिणाम, तंत्रज्ञानावरील वाढते अवलंबित्व, गोपनीयता, सायबर गुन्हे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अनियंत्रित वापरातून निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांपर्यंत विविध मुद्द्यांना विद्यार्थ्यांनी स्पर्श केला. अभ्यासपूर्ण आशय, मुद्देसूद मांडणी आणि ओघवत्या वक्तृत्वामुळे स्पर्धा रंगतदार झाली.परीक्षक म्हणून डॉ. सायबण्णा घोडके, डॉ. सुभाष हुलपल्ले होते.या स्पर्धेत प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर आदर्श कनिष्ठ विद्यालय, उमरगा यांना द्वितीय आणि छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बलसुर यांच्या संघाला तृतीय क्रमांक मिळाला आणि शिक्षणमहर्षी कै. माधवराव पाटील (काका) जीवन गौरव पुरस्कार प्रतिभा निकेतन उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रा. राघवेंद्र धर्माधिकारी, शिवशरण तांबडे आणि प्रतिभा भूषण पुरस्कार कु. लक्ष्मी गाडेकर, नम्रता वाकळे या सर्वांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.विजेत्या संघांना अनुक्रमे रुपये 5001, 3001 व 2001 रोख पारितोषिकासह चषक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व 11 उच्च माध्यमिक विद्यालयाचे संघांना सहभागी चषक आणि प्रत्येक स्पर्धक विद्यार्थ्याला सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.विद्यार्थ्यांना केवळ वक्तृत्वाची संधी उपलब्ध करून देण्याऐवजी आधुनिक तंत्रज्ञानाकडे चिकित्सक नजरेने पाहण्याची दृष्टी निर्माण व्हावी, नव्या तंत्रज्ञानाच्या संधी आणि त्यातील धोके या दोन्हींचा विचार करण्याची सवय लागावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला उमरगा लोहारा तालुक्यातील उच्च माध्यमिक विद्यालयाचे व विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.प्रास्ताविक उपप्राचार्य उमाकांत महामुनी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सतीश रामपुरे तर आभार प्रा. बिभीषण बंडगर यांनी मानले.


**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**

**Diploma In Medical Laboratory Technology**

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ सप्टेंबर २०२६


## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मुंबईतील कार्यक्रमाच्या ठिकाणी मोठी सुरक्षा त्रुटी



**मुंबई :** मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुल (BKC) येथील 'नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर' (NMACC) परिसरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नियोजित कार्यक्रमापूर्वी सुरक्षेतील एका मोठ्या त्रुटीमुळे खळबळ उडाली आहे. कडक सुरक्षा व्यवस्था असतानाही स्वतःला पंतप्रधान कार्यालयाचा (PMO) वरिष्ठ अधिकारी सांगणारा एक भामटा आणि त्याच्या सशस्त्र अंगरक्षकाला मुंबई पोलिसांनी कार्यक्रमस्थळावरून शिताफीने ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे व्हीव्हीआयपी (VVIP) सुरक्षेत तैनात असलेल्या यंत्रणांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ताब्यात घेण्यात आलेल्या मुख्य संशयिताचे नाव रोहन पारेख (वय २४ वर्षे) असे आहे. रोहन पारेख हा एनएमएसीसी संकुलात अत्यंत रुबाबात वावरत होता आणि स्वतः पंतप्रधान कार्यालयाचा वरिष्ठ अधिकारी असल्याचे भासवत होता. विशेष म्हणजे, त्याच्या संरक्षणासाठी त्याने स्वतःसोबत एक खासगी अंगरक्षकही (बॉडीगार्ड) ठेवला होता.

पंतप्रधानांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर विशेष सुरक्षा दल (SPG) आणि मुंबई पोलिसांकडून परिसरात कडक तपासणी सुरू होती. त्यावेळी रोहन आणि त्याच्या अंगरक्षकाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्यांना रोखले. चौकशीदरम्यान रोहनने पोलिसांना पंतप्रधान कार्यालयाचे ओळखपत्र दाखवले; मात्र सूक्ष्म तपासणीअंती ते ओळखपत्र पूर्णपणे बनावट असल्याचे निष्पन्न झाले. झडती घेतली असता त्याच्या अंगरक्षकाकडे एक लोड केलेली बंदूक (पिस्तूल) मिळून आल्याने सुरक्षा अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबई दौऱ्याच्या अनुषंगाने बीकेसी परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त आणि कडक सुरक्षा प्रोटोकॉल लागू करण्यात आला होता. अशा अत्यंत संवेदनशील ठिकाणी एक २४ वर्षांचा युवक बनावट ओळखपत्र आणि शस्त्रासह थेट कार्यक्रमाच्या आवारात कसा काय पोहोचला, असा गंभीर प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. वेळीच सतर्कता दाखवल्यामुळे मोठा अनर्थ टळला असला, तरी या सुरक्षा त्रुटीने यंत्रणांच्या कारभारावर प्रश्न निर्माण केले आहेत.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन या संपूर्ण प्रकरणाचा तपास तात्काळ मुंबई पोलीस गुन्हे शाखेकडे (Crime Branch) सोपवण्यात आला आहे. केंद्रीय गुप्तचर यंत्रणाही या तपासात सहभागी झाल्या आहेत. रोहन पारेख याने हे बनावट ओळखपत्र कुठून मिळवले, त्याचा कार्यक्रमस्थळी प्रवेश करण्यामागील मूळ हेतू काय होता, आणि यामागे कोणती टोळी किंवा षड्यंत्र आहे का, या दिशेने गुन्हे शाखा दोन्ही संशयितांची कसून चौकशी करत आहे.

## श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने कदेर येथे वृक्ष लागवड व वृक्ष रक्षाबंधन




**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** आज तालुक्यातील कदेर येथे श्रीकृष्ण महाविद्यालय ,गुंजोटीच्या राष्ट्रीय सेवा योजना व ग्रामपंचायत कार्यालय कदेर, यांच्या संयुक्त विद्यमाने पशुवैद्यकीय दवाखाना कदेर येथे वृक्ष लागवड , वृक्षरक्षाबंधन, महिला आरोग्य शिबिर ,गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, दिव्यांगाना धनादेशाचे वाटप आणि अंगणवाडीतील लहान मुलांना गणवेश इत्यादी कार्यक्रम आणि नवोपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार संत गाडगे बाबा यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून श्रीकृष्ण महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावात एक दिवसीय वृक्ष लागवड घेण्याचे निश्चित झाले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला चौकातील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून वृक्षदिंडीला सुरुवात करण्यात आली. वृक्षदिंडी प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळी आल्यानंतर राजमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वंदन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्या पंचायत समितीच्या सभापती श्रीमती ॲड .आकांक्षा चौगुले यांनी वृक्ष लागवड आणि वृक्षरक्षाबंधन ही अनोखी संकल्पना असून गावागावात ही चळवळ म्हणून उभी राहिली पाहिजे असे सांगून आज पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि पावसाचा लहरीपणा हे निसर्गच असंतुलन असून आपण सगळ्यांनी वेळीच सावध झालं पाहिजे अन्यथा येणारा काळ अत्यंत कठीण असेल याची जाणीव आपल्याला झाली पाहिजे .एक सभापती म्हणून नव्हे तर एक छोटी,मोठी बहीण ,लेक म्हणून जेवढी शक्य होईल तेवढी मदत मी केव्हाही करायला तयार आहे.केव्हाही अगदी निःसंकोचपणे मला आवाज द्या,लोकप्रतिनिधी म्हणून आपल्या कामासाठी मी कधीही तत्परतेने उभी असेन असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा. सौ. उषाताई रवींद्र गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त करून अशा नवनवीन उपक्रमाच्या आयोजनामुळे गावातील एकूणच वातावरण, सौहार्दाची भावना वाढीस लागण्यास मदत होते असे सांगितले. यावेळी व्यासपीठावर श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड, उपसभापती रेखा विक्रम इंगळे , पंचायत समिती सदस्या मा. सौ. महानंदा कलबुर्गे, गटविकास अधिकारी मा. श्री. प्रशांतसिंह मरोड, सहाय्यक गटविकास अधिकारी मा. श्री विनोद खरात, माजी सरपंच सतीश जाधव , माजी उपसरपंच राणी राठोड, याशिवाय प्रशासनातील अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या छोटे कधी कार्यक्रमानंतर वृक्ष लागवड आणि वृक्षारंधन आणि महिला आरोग्य शिबिर यशस्वीपणे संपन्न झाले. या संपूर्ण कार्यक्रमास कदेर गावातील बहुसंख्य नागरिक, महिला आबालवृद्धा , महिला बचत गटाच्या सर्व पदाधिकारी, आशा कार्यकर्त्या, श्रीकृष्ण महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक ,प्राध्यापकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते .या सबंध कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीकृष्ण महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ.राजाराम निगडे यांनी केले.